कौ. हि.म.सं.अर्ज क्र. क्र.३०/२०२३
अश्विनी व इतर व अशोक व इतर

नि.क्र.१४ खाली

**अर्जदार अश्विनी अशोक लहामगे पुढील सरतपास शपथेवर वकील श्री. आर. एस. देशमुख यांचे मार्फत –**

माझे शपथपत्रातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहीलेला असून तो खरा आहे. त्यातील मजकुर वाचल्यानंतर मी त्यावर माझी सही आहे. मी कौटूंबिक घटना अहवाल हजर केला. त्यास **नि.क्र.१७** देण्यात आले. मी लग्नातील फोटो हजर केले, त्यास **नि.क्र.१८** देण्यात आले. मी माझे लग्नाची पत्रिका हजर केली. त्यास **नि.क्र.१९** देण्यात आले. मी अर्जदार क्र.२ श्रेयस याचे शाळेतील बोनाफाईड प्रमाणपत्र हजर केले. त्यास **नि.क्र.२०** देण्यात आले. मी अर्जदार क्र.२ याच्या आधारकार्डची प्रत हजर केली. त्यास **नि.क्र.२१** देण्यात आले.

पुढील सरतपास संपला.

**अर्जदाराचा उलटतपास**

**गैरअर्जदारांतर्फे वकील श्री. एच. व्ही. वाघमारे यांचे मार्फत –**

माझे नववी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मला मराठी वाचता येते. सध्या मी काहीही काम करीत नाही. सध्या माझे पालनपोषण माझे वडील करतात. माझे वडील शेती करतात. माझ्या वडीलांकडे शेती आहे. किती शेती आहे, याची मला माहिती नाही. वडीलांकडे शेती असल्याबाबत दर्शविणारे कागदपत्र हजर केले नाही.

सदरचे कागदपत्र मी हजर करू शकते. माझे वडीलांचे मासिक तसेच वार्षिक उत्पन्न मला सांगता येणार नाही. मी लग्न झाल्यानंतर २ ते ३ वर्षे गैरअर्जदारांसोबत चांगले नांदले. हे म्हणणे खरे नाही की, सदर कालावधीमध्ये मला कोणताही त्रास झाला नाही.

. माझ्या मुलाचा जन्म दि.२५.१२.२०१७ रोजी झाला. माझे लग्नामध्ये मनीमंगलसुत्र हे माझे आईवडीलांनी घातले. सदरचे मनीमंगलसुत्र माझे आईवडीलांनी कोणत्या तारखेला घेतले व कोणाकडून खरेदी केले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, लॉकेट व्यतिरिक्त इतर नमूद दागिने मला लग्नादिवशी घरच्यांनी दिले. हे म्हणणे खरे नाही की, मुलाचे दागिने हे दि.०५.०३.२०१७ रोजी दिल्याचे मी खोटे नमूद केले आहे. संसार उपयोगी वस्तु यांची यादी मी हजर केलेली नाही. लग्नामध्ये रक्कम रू.२,३१,०००/– चे दागिने वडीलांनी दिल्याचे दर्शविणारे कागदपत्र हजर केले नाहीत. लग्नानंतर प्रथमतः कोणत्या तारखेला, महिन्याला व साली गैरअर्जदार याने मारहाण केली, हे मला सांगता येणार नाही. लॉकडाऊनच्या पुर्वीपासून मी गैरअर्जदारापासून वेगळी राहत आहे. माझे दाखल अर्जामधील किती तारखेपासून मी गैरअर्जदारापासून वेगळे राहत आहे, हे सांगता येणार नाही. अर्जातील मजकूर माझे सांगण्यावरून नमूद केला आहे. प्रकरण पाहून मी ती तारीख सांगू शकते. आता मला

नि.क्र.०१ दाखविण्यात आले, ते वाचून मला त्यातील प्रकरण दाखल करण्यास झालेल्या कारणाची तारीख मला सांगता येणार नाही. प्रकरण दाखल केल्याची तारीख मला सांगता येणार नाही. मी, माझे मुलाचे व माझे खर्चाचे बाबतीत प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला व माझे मुलास गैरअर्जदार यांचेकडून उदरनिर्वाहाकरिता खर्च मिळावा याकरिता प्रकरण दाखल केले आहे.

प्रश्न तुम्ही नांदण्यास जाण्यास तयार आहात का ?

उत्तर मला नांदण्यास घेऊन जातात, पण मला मारहाण करतात. मला ०५.०० वाजेपर्यंत दरवाजात उभे करतात. माझे वडील येऊन मला घेऊन जातात. त्यांची आई व बहिण देखील त्यात शामील असतात.

प्रश्न गैरअर्जदार यांनी जर आजरोजी चांगले नांदविल असे लेखी हमी दिल्यास तुम्ही नांदण्यास जाण्यास तयार आहात का ?

उत्तर असे खुप वेळा झाले. दोन ते तीन वेळेस मी गेलेली आहे.

दोन ते तीन वेळेस मी कोणत्या वर्षी व कोणत्या प्रकरणात गेले याबाबत मला सांगता येणार नाही. मी गैरअर्जदार यांचे विरूध्द पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार दिली होती. मी कुंडलिक नगर पोलीस स्टेशन, संभाजी नगर येथे तक्रार दिली होती. सदर तक्रार मी लॉकडाऊन पुर्वी दिली होती. दोन ते तीन वेळा गैरअर्जदाराकडे

गेल्यानंतर परत आल्यावर मी गैरअर्जदाराविरूध्द पोलीस तक्रार दिलेली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ याने औरंगाबाद येथील न्यायालयामध्ये मी नांदण्यास येण्याकरिता प्रकरण दाखल केलेले होते. सदर प्रकरणाचा क्र.१९६/२०२० असा असल्याबाबत मला सांगता येणार नाही. सदर प्रकरणामध्ये ६० दिवसांचे आत नांदण्यास जावे असे मला न्यायालयाने आदेशित केल्याचे मला माहीत नाही. मी ६० दिवसांमध्ये नांदण्यास गेले नाही त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याने वकिलांमार्फत कायदेशीर नोटीस पाठविली, याची मला माहिती नाही. कौटूंबिक न्यायालय, औरंगाबाद येथे सदर प्रकरणाबाबत दरखास्त दाखल केल्याची मला माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणामध्ये मी हजर होऊन मी नादंण्यास जाण्यास तयार आहे, असे लेखी दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरण संपले व त्यानंतर मी माझे वडीलांसोबत माहेरी निघुन आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याने वेदांत नगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती व मी पोलीसांना मी नांदण्यास जाणार नाही, असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ याने फारकतीबाबत प्रकरण दाखल केले आहे. सदर प्रकरणाचा क्र.२१२/२०२३ असा असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणामध्ये मी हजर राहते. हे म्हणणे खरे नाही की, सदर

प्रकरणामध्ये मी नांदण्यास जाण्यास तयार नाही, असे कळविले होते. नि.क्र.१ मध्ये पुर्वीच्या दाव्याचा तपशिल नमूद नसल्याबाबत मला कारण सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सगळे माहिती होते, परंतू लपवून मी सदरचे प्रकरण दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, फारकतीचे प्रकरणामध्ये मी पंधरा लाख रुपये दिले तर घटस्फोट देण्यास तयार आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांनी मुलाचा ताबा द्यावा व मी साडे तीन लाख रुपये देतो, असे सांगितले, परंतू त्याचेकडून जास्त रक्कम उकळण्याकरिता सदरचे प्रकरण दाखल केले.

मी नांदण्यास येण्याचे दाखल केलेल्या प्रकरणामध्ये साक्ष दिल्याचे मला आता सांगता येणार नाही. सदर प्रकरणापुर्वी गैरअर्जदार क्र.१ याने महिला तक्रार निवारण केंद्र औरंगाबाद येथे तक्रार दिल्याचे मला माहिती नाही. माझे वडीलांचा मोबाईल क्रमांक सांगता येणार नाही. मोबाईल् क्रमांक सांगितल्यास तो मला ओळखता येणार नाही. मोबाईल क्र.८७९३५५०७७७ हा माझे वडीलांचा मोबाईल क्रमांक असल्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोबाईल क्रमांकावरती पोलीसांनी माझे वडीलांना फोन केला असता माझे वडीलांनी माझी मुलगी पाठवायची नाही, जालना येथील न्यायालयात फारकत घ्यायची आहे, असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांचेकडून पंधरा ते वीस लाख रुपये

मिळविण्याचे उद्देशाने सदरचे प्रकरण दाखल केले. अंबड येथील न्यायालयात प्रकरण चालु असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अंबड येथील न्यायालयामध्ये गैरअर्जदार क्र.१ याने मुलाचा ताबा मिळावा याकरिता प्रकरण दाखल केले असून त्यामध्ये मी हजर झाले आहे. अशोकचंद कुमार डोंगलवार हे कपड्याचे दुकान मला माहीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर कपड्याचे दुकानी मी कामास आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी मला दरमाह दहा हजार रुपये पगार मिळतो. हे म्हणणे खरे नाही की, अंबड येथील प्रकरणात मी सदर दुकानी कामात असल्याबाबतचा बेलीफ यांचा अहवाल असून देखील मी काम करीत नसल्याबाबत खोटे सांगत आहे.

. गैरअर्जदार क्र.१ याने माहेरहून किती रक्कम आण अशी मागणी केली ती रक्कम मला आता सांगता येणार नाही. सदर मागणी अहवाल शपथपत्रात मी नमूद केले आहे. आता मी माझे शपथपत्र वाचले. त्यामध्ये गैरअर्जदार यांनी रक्कम रू.५०,०००/– ची मागणी केली याबाबत नमूद केले आहे. सदर रक्कम कोणी व कोणत्या वर्षी मागितले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर रकमेची मागणी केली नाही, त्यामुळे त्याबाबत मला सांगता येणार नाही. हीच रक्कम नांदण्यास येण्याच्या प्रकरणात मागणी केल्याचे मला आता सांगता येणार नाही.

नांदण्यास येण्याचे प्रकरणामध्ये मी गैरअर्जदार यांनी पाच लाख रुपयाची मागणी केली होती, असे नमूद केल्याचे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ यांना वडील नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.३ हिचे लग्न माझे लग्नापुर्वी झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती तिचे पतीसोबत वेगळे राहण्यास आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.२ ही घराचे वर पत्राचे शेडमध्ये वेगळे राहण्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, सासरी ३०० स्क्वे.फुटमध्ये २ रूम असलेले घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.०३.२०२० रोजी कोणतीच घटना घडली नाही, त्याबाबत मी शपथपत्रात खोटे नमूद केले आहे. माझ्या आईवडीलांना मी नांदण्यास जावे असे वाटते त्यामुळे परिच्छेद क्र.५ मधील मजकुर नमदू केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईवडील गैरअर्जदार यांचेकडे कधीही गेले नाही, त्याबाबत मी खोटे नमूद केले आहे.

हे म्हणणे खरे आहे की, पिटीशन क्र.ए–२१२/२०२३ या प्रकरणामध्ये मला पोटगी मंजूर केलेली आहे. सदर प्रकरणामध्ये एक वेळेसच गैरअर्जदार क्र.१ याने पोटगी भरली. गैरअर्जदार क्र.१ याने एकदाच पैसे दिल्यामुळे मी हे प्रकरण दाखल केले. पोटगी वसुलीबाबत गैरअर्जदाराविरूध्द वॉरंट काढल्याचे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार क्र.१ हा नियमित

पोटगीची रक्कम मला देतो, तरी देखील मी परिच्छेद क्र.६ मध्ये त्याअनुषंगाने खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी गैरअर्जदारासोबत नांदण्याची इच्छा नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ हा मला नांदण्यास घेऊन जाण्यास तयार असताना देखील मी परिच्छेद क्र.७ मध्ये खोटा मजकुर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ याने मी नांदण्यास येण्याबाबत सर्व कायदेशीर प्रयत्न करून देखील मी माझे शपथपत्राचे परिच्छेद क्र.८ मध्ये मजकुर खोटा नमूद केला आहे.

. मी गैरअर्जदारासोबत नांदत असताना स्वयंपाक मी करत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर स्वयंपाक काय करायचा हे मी ठरवित होते. हे म्हणणे खरे नाही की, घरातील कामाव्यतिरिक्त गैरअर्जदार हे मला इतर काम सांगत नव्हते. मला गैरअर्जदार हे बाहेरचे कोणते काम सांगत होते, याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र.९ मधील मजकुर मी खोटा नमूद केला आहे. पोटदुखीच्या आजाराबाबत मी वैद्यकीय कागदपत्र दाखल केले नाहीत. मी शारिरिक दृष्ट्या फिट नसल्याचे दर्शविणारे कागदपत्र हजर केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील माझे पालन पोषण करण्यास सक्षम आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील सक्षम असल्यामुळे मी कोणताही कामधंदा करीत नाही. आमचे गावात बाईस अडीचशे रुपये

मजुरी मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मी काम करून पैसे कमवू शकते, तरीदेखील परिच्छेद क्र.९ मध्ये मी काम करण्यास असमर्थ असल्याबाबत खोटे नमूद केले आहे. माझे पती हे ठेकेदार आहेत. माझे पतीचे किती शिक्षण झाले याची मला माहिती नाही. ते इंजिनिअर असल्याबाबत मला माहिती नाही. माझे पती गुत्तेदार असल्याबाबत मी कागदपत्र हजर केले नाहीत. गुत्तेदारीचा परवाना हा सुशिक्षीत इसमास दिला जातो, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती हे सेंट्रींग मजुरीचे काम करीत असून मी ते गुत्तेदार असल्याबाबत खोटे नमूद केले. माझे पतीच्या नावावर दोन मजली इमारत गाळ्यासहीत असल्याचे दर्शविणारा कागद मी हजर केला नाही. सदर इमारतीमधून माझे पतीस दरवर्षाला दहा लाख रुपये उत्पन्न मिळते याबाबत कागदपत्र हजर केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीस मजुरीपासून दर दिवशी तिनशे रुपये उत्पन्न मिळते, त्यातून तो दर महिना तीन हजार रुपये पोटगी खातीर देतो. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.२ व ३ हे वेगळे राहत असून मला त्यांचे कडून मानसिक व शारिरीक त्रास देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सत्य परिस्थिती लपवून तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे प्रकरण दाखल केले, तसेच खोटे शपथपत्र देऊन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वरील जबाब साक्षीदारास वाचुन दाखवला. तो त्यांनी त्यांच्या सांगणेप्रमाणे नमुद केल्याचे कथन केले.

समक्ष,

स्वाक्षरीत/-
(चेतन जगताप)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
घनसावंगी.

दिनांक ३०/०३/२०२६